## :कधीही रद्द न होणारे मुखत्यारपत्र:

कधीही रद्द न होणारे मुखत्यारपत्र आज रोजी शुक्रवार, दिनांक 12 माहे मार्च सन 2021 ते दिवशी मिळकत म.न.पा.औरंगाबाद हद्दीतील मौजे हर्सुल शिवारातील सर्व्हे नंबर 154 पैकी प्लॉट क्रमांक 04 बाबत -----

**लिहुन घेणार** **सृष्टी डेव्हलपर्स**
कार्यालय: प्लॉट नं.264,एन-1,सिडको,औरंगाबाद-431001
तर्फे भागीदार :

**1.सौ. शुभांगी रविंद्र जाधव**
वय : 49 वर्ष, धंदा : व्यापार,
रा.प्लॉट नं.25,रेणुका नगरी,बीड बायपास रोड,
औरंगाबाद-431005
PAN-AJDPJ-7846-H

**2.सौ. योगीता संजय मगर**
वय : 31 वर्ष, धंदा : व्यापार व शेती,
रा.एन-11,सी-6/4,दीपनगर,हडको,औरंगाबाद-431003
PAN-CDUMP-0216-M UID-6320-2250-2565

**3.श्री. विकास विष्णु तरटे**
वय : 30 वर्ष, धंदा : व्यापार व शेती,
रा.पिसादेवी रोड,औरंगाबाद-431001
PAN-AJLPT-6313-M UID-4020-7315-0600

(येथुन पुढे याचा उल्लेख " **लिहून घेणार** " असा केला असुन,सदर संज्ञेत प्रस्तुत भागीदारी संस्था,तिचे सद्याचे भागीदार,त्यांचे सर्वांचे वारसदार या सर्वांचा समावेश आहे व राहील.)

**लिहून देणार: 1.** **श्री. प्रकाश सुका अत्तरदे**
वय : 65 वर्ष, धंदा : व्यापार,
रा.एन-9,एम-2,जे-18,सिडको,औरंगाबाद-431003
PAN- ABDPA-6494-J UID 9207-0107-9362

**2.** **श्री. अभय शंकर जावळे**
वय : 42 वर्ष, धंदा : व्यापार,
रा.24,भुषण नगर ,गारखेडा,औरंगाबाद-431009

अ ग ग-१
१७१४ | ५ | ३६
२०२१

Seal of the Jt. Sub-Registrar Aurangabad No.1

PAN-ADYPJ-8767-E

UID-6721-8374-9858

( ज्यांचा उल्लेख यापुढे थोडक्यात "लिहून देणार " म्हणुन केलेला असून त्या मध्ये त्यांचे वालीवारस,हक्कदार,नॉमीनीज,कुलमुखत्यार एजंट यांचा सर्वांचा समावेश आहे व राहील)

**कारणे कधीही रद्द न होणारे मुखत्यारपत्र लिहुन देतोत की,**

**1) मिळकचे वर्णन**

तुकडी औरंगाबाद,पोट तुकडी औरंगाबाद,मे सब-रजिस्टर साहेब औरंगाबाद, यांचे कार्यक्षेत्रातील म.न.पा.औरंगाबाद हद्दीतील मौजे हर्सुल शिवारातील सर्व्हे नंबर 154 पैकी प्लॉट क्रमांक 04,क्षेत्रफळ 1230.426 चौरस मीटर . यासी चतु:सीमा पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| पूर्व | : | बाजार समीतीची जागा, |
| पश्चिम | : | प्लॉट क्रमांक 03, |
| दक्षिण | : | प्लॉट नंबर 34,6.0 मीटर रुंद रस्ता व रेखांकनातील खुली जागा, |
| उत्तर | : | 36.00 मीटर रुंद रस्ता |

2) वर नमुद केलेल्या मिळकत लिहुन देणार यांचे मालकीची असुन, मिळकत लिहुन देणार यांचे प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात असून, सदर मिळकतीची विक्री करणेचा अगर विल्हेवाट लावणेचा लिहुन देणार यांना पुर्णपणे हक्क व अधिकार आहे.

3) सदरील मिळकत ही आजमितीस पुर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजाविरहीत असुन, लिहुन देणार यांचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीतील आहेत. सदर मिळकतीचा विकास करण्याचा लिहून देणार यांचा मनोदय आहेत. परंतु तांत्रिक ज्ञान व अनुभव नसल्याने या मिळकतीचा विकास करणे लिहुन देणार यांना शक्य नाही. सबब हे विकास काम त्रयस्थ व्यक्ती अथवा एजन्सीकडुन करुण घेण्याचे लिहुन देणार यांनी ठरविले. त्याप्रमाणे लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांचेबरोबर या मिळकतीचे विकास कामाबद्दल चर्चा केली व या मिळकतीचा विकास करण्यासाठी काही अटी व तरतुदीनुसार लिहुन देणार यांनी सदर मुखत्यारपत्र लिहुन घेणार यांचे नावे करुन देण्याचे मान्य केलेले आहे. सदर मिळकतीबाबतचा विकसन करारनामा लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना दिनांक 12/03/2021 रोजी लिहुन दिलेला असुन, तो. मे.दुय्यम निबंधक साहेब, औरंगाबाद यांचे कार्यालयात दस्त क्रमांक 1713 अन्वये नोंदविलेला आहे.

S.R. Jadhav (signature)

4) वर नमुद केलेल्या मिळकतीचा विकास करण्यासाठी लिहुन देणार यांनी विकसनाचे काम लिहुन घेणार यांचेकडे सोपविलेला आहे व लिहुन घेणार व लिहुन देणार यांच्यामध्ये झालेल्या चर्चेअंती या मिळकतीच्या विकास कामाकरीता विकसन करारनामा व कधीही परत घेता न येणारे रद्द न होणारे मुखत्यारपत्र लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांचे नावे लिहुन, नोंदवुन देण्याचे

Seal of the Jt. Sub-Registrar Aurangabad No.1

| अ ग ग-१ | | |
|---|---|---|
| १६७४ | ६ | ३६ |
| २०२१ | | |

मान्य केलेले आहे. त्यानुसार सदरचा मुखत्यारपत्राचा दस्त लिहुन देणार हे लिहुन घेणार यांना लिहुन व नोंदवुन देत आहेत व सदर मुखत्यारपत्राच्या आधारे लिहुन घेणार यांनी खालील नमुद केलेली कामे करावयाची आहेत.

5) नियोजित विकास कामासाठी, सदर मिळकतीवर बांधकाम करणेकामी आवश्यक त्या सक्षम कार्यालयाकडुन परवाणगी घेणे व सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करणे व आवश्यक त्या सरकारी कार्यालयात व सक्षम अधिका-याकडे बांधकाम करणेकामी अर्ज देणे, जाबजबाब देणे, सह्या-संमती देणे, बांधकामास परवानगी घेणे, बांधकामाचा नकाशा मंजुर नकाशा सक्षम त्या कार्यालयामार्फत रिव्हाईज करुन घेणे व रिव्हाईज्ड मंजूर नकाशा लिहून घेणार यांनी त्यांच्या मर्जीनुसार तयार करावा व तो लिहून देणार यांचेवतीने स्वाक्ष-या करुन योग्य त्या कार्यालयाकडुन संमत करुन मंजूर करुन घ्यावा. सदर बांधकाम परवानगी मिळणेसाठी व बांधकाम नकाशा मंजूर करणेसाठी लागणा-या आवश्यक बाबींची पूर्तता करावी, कागदपत्रे दाखल करावीत, आवश्यक ते जाबजबाब द्यावेत, आकारण्यात येणारी सरकारी फी भरावी व त्या अनुषंगाने आवश्सक ती करावी लागणारी सर्व कामे लिहून घेणार यांनी लिहून देणार यांचे वतीने करावीत.

6) नियोजित बांधकाम क्षेत्रासाठी आवश्यक त्या सरकारी परवानगीकरीता, मंजुरीकरीता लिहून घेणार यांनी अर्ज करावेत व डेव्हलपमेंट चार्जेस भरावेत.

7) सदर मिळकतीचे नियोजित विकास काम पुर्ण झाल्यानंतर होणारी विकसित मिळकत म्हणजेच बांधलेल्या इमारतीमधील युनिटस्चे विक्रीकामी ग्राहकांशी चर्चा करुन त्याची विक्री किंमत ठरविण्याचा अधिकार विकसन करारान्वये लिहून घेणार यांना राहील. सदर विकसनाचे काम पूर्ण झाल्यानंतर लिहून देणार यांना विकसन करारनामा अन्वये मोबदला दाखल मिळालेल्या सदर मिळकतीवर बांधण्यात येणा-या **''सृष्टी रेसीडन्सी''** या प्रकल्पातील अनुज्ञेय असलेल्या निवासी स्वरुपाच्या बांधकामापैकी 50 % बांधकाम विनाशुल्क बांधुन द्यावयाचे आहे. तसेच सदर मिळकतीच्या विकसनाचा लिहून घेणार हे लिहून देणार यांना देत असलेल्या सदर मिळकतीवर बांधण्यात येणा-या **''सृष्टी रेसीडन्सी''** या प्रकल्पातील अनुज्ञेय असलेल्या निवासी स्वरुपाच्या बांधकामापैकी 50 % बांधकाम सोडून लिहून घेणार यांचे लाभात आलेल्या उर्वरित बांधकाम विक्री करणेकामी व्यवहार पक्का करण्याचे दृष्टीने विसार रक्कम स्वीकारणे, त्याच्या पावत्या देणे, करार करणे. तसेच लिहून घेणार यांच्या हक्कात असलेल्या याबाबी करिताचे अधिकार लिहून घेणा-यास कायमस्वरुपी राहतील. लिहून घेणाराने अशा विकसित मिळकतीच्या विक्रीकरीता केलेले सर्व व्यवहार, स्विकारलेली रक्कम, विकसन करारानुसार लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहतील.

Seal of the Jt. Sub-Registrar * Aurangabad No.1 *
सत्यमेव जयते

अ ब द - १
१६९८ ६ ३८
२०२१

8) तसेच विकास कामाकरिता व नियोजित बांधकामाकरीता स्कीम फायनांस घेणेकामी ज्या बाबींची पुर्तता करावी लागेल त्या बाबींची पुर्तता लिहून घेणार यांनी त्यांच्या जबाबदारीवर करावी व स्कीम फायनांस घेऊन त्यांची परतफेड लिहून घेणार यांनी त्यांच्या जबाबदारीवर करावी. तसेच मिळकत विकसीत केल्यानंतर सदर विकसित मिळकतीच्या म्हणजेच बांधलेल्या नियोजित इमारतीमधील सदनिका /गाळे खरेदीदार यांना कर्ज घ्यावयाचे असल्यास आवश्यक ती कागदपत्रे व जाबजबाब दयावेत व आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करावी.

9) विकसित मिळकतीचे म्हणजेच नियोजित इमारतीमधील सदनिका/गाळे यांचे ठरविलेले व्यवहार मा.दुय्यम निबंधक यांचेसमोर समक्ष हजर राहून करारनाम्यावर, खरेदीखतावर, दुरूस्तलेख, घोषणापत्र, रद्दबादल लेख, मान्यतापत्र व विविध प्रकारचे दस्तऐवज गहाणखत, लिज डिड, लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनामा अथवा अन्य हस्तांतराच्या दस्तावर लिहून देणार यांचेवतीने स्वाक्षरी करुन ते हजर करुन नोंदवून देण्याचे अधिकार लिहून घेणा-यास आहेत व दस्त कबुल करावेत. लिहून घेणार यांनी त्यांचे स्वत:चे किंवा त्यांचे फर्मचे नावाने बँकेत उघडावे. तसेच सदर मिळकतीच्या विकसना संदर्भात व विकसित झालेल्या मिळकतीचे हस्तांतरा संदर्भात आवश्यक ते सर्व विविध प्रकारचे दस्तऐवज नोंदविणे व कबुल करणे.

10) तसेच मिळकत बिगरशेती करणेकामी लिहून देणार यांच्या वतीने सदर मुखत्यार पत्राच्या आधारे अर्ज, प्रतिज्ञापत्र, सही, संमती व इतर सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता लिहून घेणार यांनी करावयाची आहे मात्र मिळकत बिगरशेती करणे कामे लागणारा सर्व खर्च लिहून देणार यांनीच करावयाचा आहे.

11) नियोजित विकास काम म्हणजेच सदर मिळकतीवर करावयाचे असलेले बांधकामाच्या प्लॅनमध्ये कायदेशीर बदल करुन ते पुन्हा रिव्हाईज बांधकाम प्लॅन अन्वये मंजुर करुन घेण्याचे अधिकार लिहून घेणा-यास आहेत. मात्र असे बदल कायदेशीर असणे आवश्यक आहे.

12) नियोजित बांधकामासाठी लिहून घेणा-यास सदरील प्रकल्पातील विकासकाच्या मोबदल्याचे 50 टक्के बांधकाम कोणत्याही बँकेस अथवा वित्तीय संस्थेस तारण ठेवून स्कीम फायनांस अथवा कर्ज घेण्यास परवानगी सदर मुखत्यारपत्राच्या आधारे राहील व सदर कर्जाची फेड व्याजासह करण्याची जबाबदारी लिहून घेणा-याची राहील. विकसीत मिळकतीच्या खरेदीदारास त्याची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी हस्तांतर केली जाईल. याची दक्षता घेणार यांनी घ्यावयाची आहे त्या अनुषंगाने करावयाची असलेली आवश्यक ती सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता लिहून घेणार यांनी सदर मुखत्यारपत्राचे आधारे करावयाची आहे.

13) विकसीत झालेल्या मिळकतीबाबतचे आवश्यकता असल्यास बांधकामसहचे घोषणापत्र लिहून घेणा-यांनी लिहून देणार यांचेवतीने स्वाक्षरी करुन नोंदवुन घ्यावे. तसेच आवश्यकता

Seal of the Jt. Sub-Registrar
सह दुय्यम निबंधक औरंगाबाद क्र. १
सत्यमेव जयते
Aurangabad No. 1

अ ग ग-१
9698 | 2 | २६०
२०२१

भासल्यास असोसिएशन ऑफ अपार्टमेंट ओनर्स किंवा सोसायटी स्थापन करणेकामी आवश्यक त्या सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

14) सदर मिळकतीच्या विकास कामासाठी लागणारे कंत्राटदार, कर्मचारी इत्यादींची नेमणुक, लिहून घेणार यांनी करावी व संबंधित कंत्राटदार, कर्मचारी इत्यादींचे करारनामे लिहून, नोंदवून, घ्यावेत. मात्र त्याच्या आर्थिक पुर्ततेसहची जबाबदारी लिहून घेणा-यावरच राहील.

15) सदरील मिळकतीवर करावयाच्या बांधकामापासुन ते मिळकती विक्रीचे व्यवहार पूर्ण होईपावेतोची सर्व कामे, कागदपत्रे, दस्त, बाबी इत्यादी लिहून घेणारांनी लिहून देणार यांचेवतीने सदर मुखत्यारपत्राच्या आधारे करावी. लिहून देणार यांना सदर मुखत्यारपत्र कधीही रद्द करता येणार नाही. तसेच मुखत्यारपत्र लिहून देणार यांचेवर व लिहून देणार यांचे वालीवारसांवर कायमस्वरुपी बंधनकारक राहील.

16) लिहून देणार यांच्या मुखत्याराने म्हणजेच लिहून घेणार यांनी लिहून देणार यांचे वतीने सदर मुखत्यारपत्रात नमुद केलेली सर्व कायदेशीर कामे, बाबी, दस्त, कागदपत्रे, स्वाक्ष-या लिहून देणार यांनीच केल्या आहेत, असे ग्राहय धरण्यात यावेत व अशी कामे, दस्त, सहया लिहून देणार यांच्यावर व लिहून देणार यांचे वालीवारसावर कायमस्वरुपी बंधकारक राहील. मात्र त्याबाबत कोणतीही आर्थिक जबाबदारी लिहून देणार यांचेवर राहणार नाही. सदरची आर्थिक जबाबदारी पूर्तता लिहून घेणार यांचेवरच राहील.

17) सदरील मिळकतीवर नियोजित बांधकामाबाबत जर कोणताही वाद उपस्थित झाला व बाब न्यायप्रविष्ठ झाली तर लिहून घेणार यांनी सदरील वादाकरीता वकिलांची नेमणुक करावी व वकिलांमार्फत वकिलपत्र सादर करुन वादाकामी आपली भुमिका मांडावी. आवश्यक वाटल्यास वाद तडजोडीअंती संपुष्टात आणावा. याकामी लिहून घेणार जो निर्णय घेतील तो आर्थिक बाब सोडून लिहून देणार यांना मान्य राहील. तसेच जि एस टी अधिका-याकडे अपील करणे, इन्कमटॅक्स ट्रॅब्युनलकडे अपील करणे, लॉ कमिशनर यांचेकडे अपील करणे, आयकर भरणे, कराबाबत किंवा बांधकामाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास त्या वादाचे निराकरण करणेकामी अधिकार लिहून घेणार यांना दिलेले आहे. तसेच लिहून घेणार यांनी आवश्यक असल्यास सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, दिवाणी न्यायालय, कमिशनर, महसुल कमिशनर, महापालिका आयुक्त, विविध न्यायालयात व विविध आवश्यक त्यासमक्ष कार्यालयात अर्ज अपील करणे, तडजोड करणे, समन्स स्वीकारणे, विविध प्रकारच्या कार्यालयामध्ये विविध प्रकारच्या न्यायालयामध्ये ज्या ज्या बाबींची पूर्तता करावी लागेल त्या त्या बाबींची पुर्तता करावी व अर्ज अपील, दावा दाखल करावा. लेबर कमिशनर, लेबर कोर्ट, इंडस्ट्रीयल कोर्टात अर्ज अपील करावयाचे असल्यास करावे किंवा जाबजबाब दयावे.

Seal of the Jt. Sub-Registrar * Aurangabad No.1 *

| अ ब ग-१ | | |
|---|---|---|
| 9698 | ८ | ३६ |
| २०२१ | | |

18) या मिळकतीलगतचे रस्त्याचे क्षेत्र वाढविण्यात आल्यास त्या कारणाकरीता अशा संपादित क्षेत्राचे खरेदीखत योग्य त्या सक्षम कार्यालयाच्या नांवे लिहून घेणार यांनी लिहून,नोंदवून दयावेत.

19) तसेच मिळकत बिगरशेती करुन लेआऊट मंजुर करुन घेणेकामी मिळकतीची मोजणी करणे, मिळकतीच्या हद्दी व चतु:सिमापुर्वक खुणा ठरविणे व इतर सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता लिहून घेणार यांनी करुन घ्यावयाची आहे.

20) सदर मिळकत विकासकामासाठी लिहून देणार यांच्यावतीने जी जी कामे करावयाची आहेत ती ती सर्व कामे लिहून घेणार यांनीच लिहून देणार यांचे मुखत्यार म्हणुन करावयाची आहेत व ती सर्व कामे लिहून देणार यांनीच केली आहेत असे समजण्यात येईल. सदरचे मुखत्यारपत्र व सदर मुखत्यारपत्रा अन्वये लिहून घेणार यांनी वर नमूद केलेल्या मिळकतीच्या विकसना संदर्भात आवश्यक केलेली सर्व कामे लिहून देणार यांचेवर व लिहून देणार यांचे वालीवारसांवर कायमस्वरुपी कायदेशीर बंधनकारक राहील.

येणेप्रमाणे राजीखुषीने, स्वखुषीने,स्वसंतोषाने आज रोजी सदरचे कधीही रद्द न होणारे मुखत्यारत्र लिहून, नोंदवून दिले असे.

**लिहून देणार:** (प्लॉट मालक) प्रकाश सुका अत्तरदे



1.श्री. प्रकाश सुका अत्तरदे



2.श्री. अभय शंकर जावळे

**लिहून घेणार : (विकासक)**
**सृष्टी डेव्हलपर्स तर्फे भागीदार :**



S.R. Jadhav

1.सौ. शुभांगी रविंद्र जाधव

Seal of the Jt. Sub-Registrar Aurangabad No.1

| | | |
|---|---|---|
| अ ग ग-१ | | |
| १६७४ | १० | ३६ |
| २०२१ | | |

2.सौ. योगीता संजय मगर





3.श्री. विकास विष्णु तरटे





**साक्षीदार 1**

प्रदिप राजकुमार चव्हाण,वय:-29 वर्षे
रा:-पाण्याच्या टाकीजवळ,कनकावती नगर,
कन्नड,ता.कन्नड,जि. औरंगाबाद
आधार क्रमांक 4577-5834-3146





**साक्षीदार 2**

जगदिश प्रभाकर बोडखे,वय:-26 वर्षे
रा:-लोहगड नांद्रा,ता.फुलंब्री,जि.औरंगाबाद
आधार क्रमांक 4223-9455-4011





Seal of the Jt. Sub-Registrar * Aurangabad No.1 *

| अ ग ग-१ | | |
|---|---|---|
| १७१४ | ११ | ३६० |
| २०२१ | | |

12/03/2021 1 06:27 PM

दस्त गोषवारा भाग-2

अगग1
दस्त क्रमांक:1714/2021 34

दस्त क्रमांक :अगग1/1714/2021
दस्ताचा प्रकार :-कुलमुखत्यारपत्र

| अनु क्र. | पक्षकाराचे नाव व पत्ता | पक्षकाराचा प्रकार | छायाचित्र | अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| 1 | नाव:श्री.प्रकाश सुका अंतरदे - -<br>पत्ता:प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: -, रोड नं: एन-9,एम-2,जे-18, सिडको,औरंगाबाद, महाराष्ट्र, औरंगाबाद.<br>पॅन नंबर: | कुलमुखत्यार देणार<br>वय :-65<br>स्वाक्षरी:- |  |  |
| 2 | नाव:श्री.अभय शंकर जाधव - -<br>पत्ता:प्लॉट नं: -, माळा नं: --, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: -, रोड नं: प्लॉट नं.1/11,नरेंद्र हौसींग सोसायटी,एन-7, सिडको,औरंगाबाद, महाराष्ट्र, औरंगाबाद.<br>पॅन नंबर: | कुलमुखत्यार देणार<br>वय :-42<br>स्वाक्षरी:- |  |  |
| 3 | नाव:मे.सुही डेव्हलपर्स तर्फे भागीदार क्र.1.सौ.शुभांगी रविंद्र जाधव - -<br>पत्ता:प्लॉट नं: --, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: -, रोड नं: प्लॉट नं.204-२,कोस्टा मॅंशन,एस एस सी बोर्डाजवळ,पीरबाजार,उस्मानपुरा,औरंगाबाद, महाराष्ट्र, औरंगाबाद.<br>पॅन नंबर: | पॉवर ऑफ अटॉर्नी होल्डर<br>वय :-49<br>स्वाक्षरी:- |  |  |
| 4 | नाव:मे.सुही डेव्हलपर्स तर्फे भागीदार क्र.2.सौ.योगीता संजय मगर - -<br>पत्ता:प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: -, रोड नं: घर नं.सी-6/4,शिवनगर,एन-11,हडको,औरंगाबाद, महाराष्ट्र, औरंगाबाद.<br>पॅन नंबर: | पॉवर ऑफ अटॉर्नी होल्डर<br>वय :-31<br>स्वाक्षरी:- |  |  |
| 5 | नाव:मे.सुही डेव्हलपर्स तर्फे भागीदार क्र.3. श्री.विकास विष्णु लवटे - -<br>पत्ता:प्लॉट नं: --, माळा नं: -, इमारतीचे नाव: -, ब्लॉक नं: -, रोड नं: प्लॉट नं.88,पिसादेवी रोड,हनुमान चौक,शक्तीनगर,पिसादेवी,औरंगाबाद, महाराष्ट्र, औरंगाबाद.<br>पॅन नंबर: | पॉवर ऑफ अटॉर्नी होल्डर<br>वय :-30<br>स्वाक्षरी:- |  |  |

वरील दस्तऐवज करुन देणार तथाकथीत कुलमुखत्यारपत्र चा दस्त ऐवज करुन दिल्याचे कबुल करतात.
शिक्का क्र.3 ची वेळ:12 / 03 / 2021 01 : 02 : 55 PM

ओळख:-
खालील इसम असे निवेदीत करतात की ते दस्तऐवज करुन देणा-यांना व्यक्तीशः ओळखतात, व त्यांची ओळख पटवितात

| अनु क्र. | पक्षकाराचे नाव व पत्ता | स्वाक्षरी | छायाचित्र | अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| 1 | नाव:जगदीश प्रभाकर पोडके - -<br>वय:26<br>पत्ता:लोहगडनांद्रा, ता.फुलंब्री,जि.औरंगाबाद<br>पिन कोड:431001 | स्वाक्षरी |  |  |
| 2 | नाव:प्रदीप राजकुमार चव्हाण - -<br>वय:29<br>पत्ता:पाण्याच्या टाकीजवळ,कनकावतीनगर,कन्नड,जि.औरंगाबाद<br>पिन कोड:431001 | स्वाक्षरी |  |  |

शिक्का क्र.4 ची वेळ:12 / 03 / 2021 01 : 04 : 18 PM

Sub Registrar Aurangabad 1

Seal of the Jt. Sub-Registrar Aurangabad No.1